## प्रकरण पहिले

## ललित गद्य : स्वरूप व विशेष

मराठीत निबंध, कथा, कादंबरी व नाटक इ. वाङ्मयप्रकार इ. स. १८१८ नंतरच जन्माला आले आणि विकसित झाले. तत्पूर्वीच्या वाङ्मयाचे स्वरूप फार वेगळे होते . प्राचीन मराठी पद्य वाङ्मयाचे संत, पंत आणि तंतवाङ्मय अशा तीन विभागात वर्गीकरण केले जाते. गद्य वाङ्मयाची परंपरा " लीळाचरित्र" पासून दाखविली जाते. पण त्यांत आधुनिक वाङ्मयप्रकार आढळून येत नाहीत. पेशवाईचा अस्त, महाराष्ट्र इंग्रजी अंमलाखाली आणि आपला इंग्रजांशी आणि इंग्रजी वाङ्मयाशी परिचय झाल्यानंतरच हे वाङ्मयप्रकार मराठीत रूढ झाले.

### अव्वल इंग्रजीतील शैक्षणिक सुधारणा

इंग्रजांचे येथील आगमन ही एक सामाजिक आणि वैचारिक क्रांती होती. इंग्रज हे औद्योगिक संस्कृतीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या आगमनाबरोबर येथे अनेक नव्या गोष्टी आल्या. त्या अभिनव होत्या. विचारी मने चक्रावून गेली. ती आत्मचिंतन -आत्मपरिशिलन करूं लागली. यांतूनच राष्ट्रवादी विचार धारेचा उदय झाला, बुध्दिवैभव

आणि कर्तृत्व पणाला लागले., हा पुढचा इतिहास आहे. पोस्ट, तारायंत्रे, आगगाडया व रस्ते इ. यांत्रिक संस्कृतीने तत्कालीन समाज दिपून गेला. इंग्रजांची वैचारिक क्षेत्रांतील सुधारणा म्हणजे त्यांनी केलेला शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार. समाजांतील सर्व स्तरांना शिक्षणाची संधी ही कल्पनाच आपणाकडे नव्हती. विषमताधिष्ठित समाजात सर्व वर्णांना शिक्षण - एकाच प्रकारचे शिक्षण ही एक अभूतपूर्व क्रांती होती. आगरकर, केशवसुतांचे नवयुग या " समते"वर अधिष्ठित होते.

## मुद्रणकला - वृत्तपत्रांचा उदय-निबंधाचा जन्म

इंग्रजांची दुसरी एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे मुद्रणकलेचा प्रारंभ। डॉ. विल्यम कैरे याने १८०५ साली कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथे देवनागरी लिपीतील पहिले मराठी पुस्तक " मराठी भाषेचे व्याकरण " छापले, आणि मराठीतील छापील ग्रंथाला प्रारंभ झाला. ही मुद्रणकला मिशन-यांच्या धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून जन्माला आली. या मिशन-यांनी शब्दकोश तयार केले, व्याकरणे रचली. विविध विषयावरील शालेय पुस्तके तयार केली. याचे बरेचसे श्रेय एल्फिन्स्टन व मेजर थॉमस कँडी यांच्याकडे जाते. छापखान्यामुळे वर्तमानपत्रांचा उदय झाला. वर्तमानपत्रातून ज्ञानाचा व नवीन मूल्यांचा प्रसार जोरदारपणे सुरु झाला. एका बाजूने शिक्षण व दुस-या बाजूने वृत्तपत्रे या दोन प्रभावी प्रसार माध्यमाद्वारे समाजाच्या बुध्दीचे व विचारांचे भरणपोषण सुरु झाले. दर्पण, प्रभाकर, ज्ञानोदय, शालापत्रक, निबंधमाला व विविधज्ञानविस्तार अशी एकामागून एक वृत्तपत्रे निघू लागली. आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पहिल्या, दुस-या पिढीतील विद्वान-मंडळी भिन्न भिन्न विषयावर आपले विचार व्यक्त करुं लागली. निबंध,

कथात्मक लेख, स्फुटलेख, कथा व प्रबंध वगैरे लेखनप्रकार उपरोक्त नियतकालिकांतून वाचकासमोर येऊ शकले. विज्ञाननिष्ठ, प्रगतिशील अशा इंग्रजी संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे आपल्या समाजांत प्रचंड घडामोडी सुरु झाल्या. जीवनाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोणच बदलला. इंग्रजी विद्या म्हणजे वाघिणीचे दूध हा विचार बळावत चालला. अज्ञान दूर करण्याची स्फूर्ती, अनेकांना मुद्रणकलेच्या सुलभतेमुळे सहजच मिळाली. लेखन हे विचार प्रकट करण्याचे, मतपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हे ध्यानांत आले. त्यावेळच्या अनेकांनी ज्ञान ग्रहण करण्यासाठी - ज्ञान देण्यासाठी - ज्ञानाने मतपरिवर्तन घडवण्यासाठी लेखणी हातांत घेतली. यातूनच, मराठीतील " निबंध " या गद्यवाङ्मयप्रकाराचा जन्म झाला.

<u>सुरवातीचे निबंध : रांगणारे गद्य.</u>

" आधुनिक मराठी वाङ्मयाचे ऐतिहासिक दृष्टया मूल्यमापन करतांना १८१८-१८७४, १८७४ -१९२० आणि १९२० नंतरचा काळ असे तीन कालविभाग स्पष्टपणे पडतात" [१] असे वि. स. खांडेकर म्हणतात. छत्रे, दादोबा पांडुरंग, बाळशास्त्री जांभेकर, परशराम-तात्या गोडबोले, व हरी केशवजी हे इंग्रजी राजवटीतील पहिले निबंध-लेखक. यांनी इंग्रजीवरुन मराठीत निबंधरचना केली आहे. पण त्यांना आजच्या अर्थाने निबंध म्हणता येणार नाही. त्यांतील बराचसा भाग बालिश स्वरुपाचा आहे. त्यांच्याकडे निबंध म्हणून पाहण्यापेक्षा "मराठी गद्य कसे आकारत होते " या दृष्टीनेच पाहणे उचित. या काळांतील लोकहितवादींची " शतपत्रे " कांही अंशी निबंध या संज्ञेला पात्र ठरतील. ज्या काळांत विद्वानमंडळी बालवाङ्मयात गर्क होती, त्या काळांत लोकहितवादी प्रौढ विचारानी युक्त असे लेख लिहित होते.

निद्रित समाजाला विचार करायला प्रवृत्त करण्याचे कार्य लोकहितवादींच्या निबंधानी केले. तथापि त्यांच्या लेखनाचे पर्यवसान स्वकियांच्या अवहेलनेत आणि इंग्रजांच्या आंधळया आदरांत झाले. त्यामुळे त्यांच्या निबंधाला एकांगीपणा, एकारलेपणा आला. शिवाय लेखनांतल्या पुनरुक्तीमुळे भाषेचे सौंदर्यही कमीच. मनातले विचार मात्र त्यांनी सोप्या, सरळ आणि सडेतोड शब्दांत मांडले. त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय म्हणजे जिव्हाळा आणि कळकळ. आगरकरांची विचारसरणी बीजरूपाने लोकहित-वादींच्या लेखनांत आढळते. एकूण १८१८ -१८७४ या कालखंडातील निबंधाचे स्वरूप प्राधान्याने बोधपरच ! भाषासौंदर्य आणि साहित्याची इतर लक्षणे कमीच !!

शैलीदार निबंधाचा कालखंड
---------------------

१८७४ साली निबंधमाले"चा जन्म झाला आणि मराठी निबंधाने वेगळे वळण घेतले. निबंधाचे " बोधवादी" वळण मागे पडून उद्‌बोधनांचे युग सुरु झाले. निबंधाच्या आशयात ( Content ) आणि अभिव्यक्तीत ( Form ) बदल झाला. हा निबंधाचा कायापालट विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी घडविला. इंग्रजीत ॲडिसन, जॉन्सन आणि मेकॉले यांनी निबंधलेखनाला नवे रूप दिले. निबंधावर स्वतःच्या वेगळया व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविला. हे तीन निबंधकार चिपळूणकरांचे आवडते निबंधकार होते. साहजिकच चिपळूणकरांच्या निबंधशैलीवर त्यांचा लेखनठसा, उमटलेला आहे. " मराठी भाषेची संप्रतची स्थिती, भाषादूषण, लेखन-शुध्दी , भाषापध्दती, इतिहास, विद्वत्व आणि कवित्व, संपत्तीचा

उपभोग, लोकभ्रम व वक्तृत्व, जॉन्सन, मोरोपंतांची कविता, लोकहितवादी अशा विविध विषयावर विष्णुशास्त्र्यांनी निबंध लिहिले. विषयाची मांडणी अगदी पध्दतशीर केली. लोकहितवादींच्या काळी असलेली बेंगरूळ विस्कळित भाषा आता उरली नाही. ओजस्वी, प्रसादपूर्ण प्रसन्न अशा भाषेचे लेणे विष्णुशास्त्र्यांनी मराठी निबंधावर चढविले.... विषयाचा उपोद्‌घात, विषयविवेचन व शेवटी उपसंहार या क्रमानेच ते आपला विषय खुलवितात. त्या अनुरोधानेच त्यांची भाषाही खुलन जाते. आपल्या तडफदार विचारासाठी तडफदार अशा भाषेचेच ते माध्यम वापरतात हेच त्यांचे वैशिष्ट्य"[२] असे प्रा. वि. पां. देऊळगावकर व डॉ. चंद्रकान्त देऊळगावकर म्हणतात ते खरेच आहे. टिळक आणि आगरकर हेही चिपळूणकरांच्या बरोबरीनेच निबंधलेखन करीत होते. राजकारण हे टिळकांचे कार्यक्षेत्र बनल्यामुळे, त्यांचे लेखन हे राजकीय विषयावरच अधिक झाले. त्यामुळे साहजिकच भारदस्तपणा, विद्वत्ता आणि तेजोपासना हे गुण त्यांत प्रकर्षाने आढळतात. सौंदर्यवेधी दृष्टी, लालित्य आणि भाषेचे अलंकारवैभव यांचा टिळकांच्या निबंधात अभाव आहे. निबंधाव्यतिरिक्त टिळकांचे लेखन संशोधनपर आहे. एवंच टिळकांची लेखनमानसिकता ही प्रबंधकाराची आहे. तथापि अधूनमधून त्यांच्या लेखनात संस्कृत सुभाषिते, मार्मिक दृष्टान्त, मर्मभेदक विनोद यांची पेरणी होते. टिळकांच्या उलट आगरकरांचे लेखन आहे. आगरकरांनी 'सुधारकांत' तात्कालिक आणि अगदी फालतू विषयावरही निबंधलेखन केले आहे. तरीही ते निबंध भावनोत्कटता, रसिकता, विनोदबुध्दी आणि शोभावर्धक भाषालंकारामुळे " ललित" होतात. त्यांच्या कितीतरी तात्त्विक आणि चर्चात्मक निबंधाना वाङ्‌मयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे. जनकल्याणाची कळकळ, प्रखर देशाभिमान, तार्किक विचारसरणी, आणि अलंकारिकता इ. गुणांचा साज आगरकरांनी मराठी निबंधावर चढविला आहे. वर्तमानपत्री लिखाणही कसे " ललित" करता येते याचा धडा शि. म. परांजपे यांच्या काळातल्या निबंधावरून शिकता येतो. कल्पकता आणि काव्य यांचा सुरेख संगम, स्वातंत्र्यलालसा आणि शैलीतला उपरोध ही

परांजपे यांच्या निबंधाची ठळक वैशिष्टये ! याच काळात वि. का. राजवाडे, चिंतामणराव वैद्य, श्री. कृ. कोल्हटकर, डॉ. श्री. व्यं. केतकर, ज्यांना "साहित्यसम्राट " ही पदवी मिळाली असे केळकर यांचे निबंध विचारशीलतेने विनटलेले आहेत. केळकर यांची कल्पकता सौम्यशीलल आहे, पांडित्य प्रसन्नतापूर्ण आहे, निबंधरचनेत चातुर्य आहे, निबंधाला कालोचित रूप देण्यात केळकरांचा हातखंडा आहे. याप्रकारे १८७४ ते १९२० पर्यंतचा मराठी निबंध हा " शैलीदार" बनत गेला. आणि या निबंधाला बहर येत असतांनाच १९२५ च्या सुमारास लालित्याचे, सौंदर्याचे एक नवे परिमाण त्याला लाभले.

## लालित्याकडे वाटचाल

१९२० पर्यंतच्या निबंधाचा-स्फुट गद्याचा-आपण जो थोडा वर आढावा घेतला, त्यावरुन एक गोष्ट स्पष्ट दिसते, की कुठल्या तरी विषयावर आपले विचार मुद्देसूद मांडून तो विषय वाचकांना व्यवस्थित समजावून सांगणे हाच निबंधाचा उद्देश असतो. म्हणूनच या प्रकारच्या निबंधाला विचारप्रधान निबंध म्हणतात. तो वस्तुनिष्ठ असतो. त्यांत तार्किकता असते. तो बुध्दिगम्य असतो. त्याची रचना पांडित्यप्रधान असते. या निबंधाची प्रेरणा इंग्रजी निबंधात होती. बेकन, ॲडिसन, स्टील, गोल्डस्मिथ, जॉन्सन, लॅंब, हॅझलिट आणि स्विफ्ट हे इंग्रजी निबंधकार, आमच्या मराठी लेखकापुढे आदर्श निबंधकार होते. लिहावे तर " त्यांच्या-सारखे " ही मराठी लेखकांची इच्छा होती. आदर्शानुरूप निबंधलेखनाचीही घडी बसत - कांहीशी बसलेली :- असतांना पुन्हा एक झोका १९२५-२६ च्या सुमारास आला. मराठी निबंधाने नवे रूप घेतले. या नव्या रूपाचे नामकरण ना. सी. फडके यानी गुजगोष्टी असे केले. पुढे ते " लघुनिबंध " या नावाने संबोधिले गेले. मराठी निबंधाने हे जे नवीन वळण घेतले पुन्हा त्याचे साचे बनले ( लघुनिबंध ), तेही मोडले गेले ( ललितनिबंध),

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

एकूण या सर्वांचे दूरगामी परिणाम आज आपल्याला दिसत आहेत. लघुनिबंधातील आत्मनिष्ठ " आविष्कार पुढच्या कालखंडात विविध दिशांनी पसरत गेलेला दिसतो. पुढे या " आत्मनिष्ठ लेखनप्रकारा" चे स्वरूप साचेबंद राहिले नाही. त्याच्या स्वरूपाप्रमाणे त्याला वेगळी नांवे मिळत गेली. कधी स्मरणांतून आठवणीतून, कधी आत्मचरित्रात्मक हकीकतीतून, कधी प्रवासाच्या निमित्ताने स्थलवैशिष्टयातून, कधी मार्मिक प्रसंगचित्रणातून कधी एखादा व्यक्तिरेखेतून तर कधीकधी विनोदी घटनांच्या मालिकेतून ही आत्मनिष्ठा लेखनांतून आविष्कृत होऊ लागली. तेव्हा या लेखनाला प्रकारनावेही वेगवेगळी मिळाली. तथापि आज हे सगळे उपप्रकार " ललित गद्य " या मुख्य प्रकारांत सामावून गेले आहेत. त्यांचा समावेश शास्त्रीय, सूक्ष्म चिकित्सेने आणि काटेकोरपणे झाला नसेल, फार तर आपल्याला ललित गद्य " ही " व्यापक संज्ञा " आहे एवढे मात्र खचितपणे म्हणतां येईल.

## ललित गद्य - एक वाङ्‌मयप्रकार

भिन्न भिन्न ललिकृतींचा अभ्यास करुन, वाङ्‌मयाचे काही सर्व-सामान्य विशेष निश्चित केले जातात. उदा. कथा, काव्य, नाटक किंवा कादंबरी हे भिन्न वाङ्‌मयप्रकार आहेत. पण ज्या अर्थी ते वाङ्‌मयाचे भिन्न प्रकार आहेत, त्याअर्थी त्या प्रत्येक प्रकारात वाङ्‌मयाचे सर्वसामान्य विशेष निश्चित आहेतच हे गृहीत धरले जाते. शिवाय प्रकार भेदांमुळे त्याचे कांही स्वतंत्र विशेषही असतातच. म्हणजे " वाङ्‌मय " या ज्या व्यापक संज्ञेखाली ते प्रकार येतात. त्या वाङ्‌मयाचे सामान्य गुणविशेष अधिक ती वाङ्‌मयकृती ज्या प्रकारांत मोडते, ते प्रकार ( ) विशिष्ट विशेष अशा अनेक गुणविशेषांचा समुच्चय त्या ललितकृतीत असतो.

तात्पर्य कोणतीही ललितकृती वाङ्‌मयाच्या कोणत्या तरी प्रकारात मोडते. ललित गद्य हाही काव्य नाटकासारखाच एक लक्षणीय वाङ्‌मय प्रकार आहे. प्रकारजाणीव ही लेखक, वाचक आणि समीक्षक या तिघांच्याही दृष्टीने एक अत्यावश्यक बाब आहे. ही प्रकारजाणीव वाचकाला आस्वादाच्या, समीक्षकाला मूल्यमापनाच्या आणि लेखकाला निर्मितीच्या दृष्टीने उपयुक्त ठरत असते. तथापि वाङ्‌मयप्रकार म्हणजे सिमेंटक्राँक्रीटचे बंदिस्त कप्पे नव्हेत. ते आकुंचन प्रसरण पावू शकतात. म्हणूनच डॉ. चंद्रकांत वर्तक म्हणतात, " साहित्यांत कथनात्मक, नाटयात्मक, भावकाव्यात्मक असे तीन मूलभूत भेद करता येतात, ललितगद्य हा कथनात्मक साहित्यप्रकार आहे., पण तो कथा आणि कादंबरीसारखा कथनात्मक साहित्यप्रकार नाही. पुन्हा ललित-गद्य हा कांही, कथा कादंबरीप्रमाणे एकसंघ प्रकार नाही. त्यांत लघुनिबंध प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण, आठवणी, आत्मचित्रण असे एका केंद्रां-कडून भिन्न दिशानी जाणारे उपप्रकारही समाविष्ट होतात. ह्या उपप्रकारांत काही समान गुण आणि कांही भिन्न गुण एकत्र झालेले प्रत्ययाला येतात. ह्यामुळे त्यांचा स्वतंत्रपणे विचार करावा लागतो." [3]

कथा कादंबरीत लेखक एखादी कथा सांगतो. कथेत एकच आशय असतो - अनुभवाचे केंद्र एकच असते. कादंबरीत लेखक अनेक आशयसूत्रावर आपले लक्ष केंद्रित करतो. अनेक अनुभवाचा आविष्कार त्याला करावयाचा असतो. कथेतील निवेदन एकाच अनुभवकेंद्राभोवती फिरत असते. उलट ते कादंबरीत, अनेक अनुभवातील परस्परसंबंध, ताणतणाव यावर प्रकाशझोत टाकीत असते. कादंबरीतील निवेदन गडद, व्यामिश्र असते, तर कथेतील निवेदन एकेरी, सरळ असते.

कथा-कादंबरीतील आशयसूत्र पात्रांच्याद्वारे अभिव्यक्त होते. आशयाशी—अनुभवाशी-कथानकाशी संबंधित त्या त्या कथानकात

कांही व्यक्ती, व्यक्तीसमूह आणि त्यांनी वेढलेले परिसर असतात. यासंबंधी डॉ. वर्तक पुढे लिहितात-" " हे सर्व कल्पित असते आणि त्याचे चित्रण कथा कादंबरीकाराला काल्पनिक पातळीवरुन करावे लागते. तो त्या जगात गुंतत नाही, पण त्याच्या व्यक्तिमत्वाचा, संस्कारांचा आणि अनुभवांच्या लागलेल्या अर्थांचा परिपाक त्या निवेदनांत उतरल्यावाचून राहत नाही. म्हणजे त्या निवेदनांत व्यक्तिविशिष्टता उतरते पण ती त्रयस्थ पातळीवरुन उतरते, कथा-कादंबरीकाराचे अगदी स्वत:चे त्याच्या खाजगीजीवनातील प्रसंगाघटनांचेही कथानकात अवतरण होईल, पण ते देखील त्रयस्थ पातळीवरुनच त्यामुळे कथाकादंबरीतील निवेदन आत्मपर असले तरी त्यामुळे ते लेखकाचे चरित्र/आत्मचरित्र असल्याचा समज करुन घेता येत नाही. कथा-कादंबरीतील " मी " देखील कल्पिताच्या पातळीवरच राहतो, असे ललित गद्यात नसते."[४]

थोडक्यात ललितगद्य हे पूर्णपणे आत्मनिष्ठ " मी "ला प्राधान्य देणारे, त्याच्या आत्मविष्काराच्या सौंदर्यफळाकडे लक्ष वेधणारे असते.

ललित गद्याचे इतर वाङ्‌मयप्रकाराहून वेगळेपण

ललितगद्याच्या स्वरुपासंबंधी प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी सखोल चर्चा केलेली आहे. " लघुकथा, ललितनिबंध आणि कादंबरी " या लेखांत ते लिहितात - " ज्या ललितलेखनांत आशय हा संपूर्णपणे नाट्यरुप धारण करतो, म्हणजेच लेखकाच्या व्यक्तिमत्वापासून अलग होतो ते लेखन म्हणजे लघुकथा, आणि ज्या ललितलेखनांत असे होत नाही ते म्हणजे ललित निबंध असा भेद आपल्याला करता येईल. लघुकथेत निवेदक असतो. आणि ललित निबंधातही असतो., परंतु लघुनिबंधातला निवेदक लेखकाच्या व्यक्तिमत्वापासून संपूर्णपणे अलग होत नाही. हे जे मी व्यक्तिमत्व म्हटले ते त्या लेखकाचे प्रत्यक्षातले व्यक्तिमत्व असेलच असे नाही. ललित निबंध लिहिण्यासाठी त्याने घेतलेली ती भूमिका असेल. पण ही भूमिका ललित निबंधाच्या आशयांत विरघळून गेलेली नसते. त्या आशयाचा तो लेखक एक भाग झालेला नसतो. तो काही अंशी भान न हरपलेला प्रेक्षक

असतो. उलट लघुकथालेखक निवेदक म्हणूनही त्या आशयाशी एकरूप झालेला असतो. त्याने निवेदन कोणत्या भूमिकेवरुन करायचे हे संपूर्णपणे तो आशय ठरवीत असतो"[५]

वरील उता-यात गाडगीळ लघुकथा व ललितनिबंध हे दोन्हीही साहित्यप्रकार कथनात्मक असले, तरी निवेदन आणि निवेदनाची भूमिका या दोन्ही दृष्टीने ते कसे वेगळे पडतात याचा विचार करीत आहेत. पुढे लघुकथा आणि ललितनिबंध यांतील घटना आणि पात्रां त परामर्श घेऊन त्यांनी आशयाच्या नाटयरूपा विषयी काही विचार मांडले आहेत. ते मूलगामी आणि महत्वाचे असल्याने त्यांची नोंद करणे आवश्यक आहे. गाडगीळ म्हणतात :- " ललितनिबंधातल्या आशयाने संपूर्णपणे नाटयरुप धारण केलेले नसते. या गोष्टीचा आणखी एक परिणाम होतो. ललित निबंधातील विविध घटक हे परस्पराशी एकजीव झालेले नसतात. त्यांचे परस्परांशी जे नाते असते ते एकसंघ आशयाला नाटयरूप देण्यासाठी निर्माण झालेले नसते. त्यांचे नाते निवेदेकाने जोडलेले असते. निवेदकाची भूमिका अगर त्याचा हेतू हा त्या घटकांना एकत्र आणणारा दुवा असतो. याचाच अर्थ असा, की त्या घटकांची रचना कलात्मक दृष्टया विस्कळित असते. कथेची रचनादेखील कलात्मकदृष्ट्या सलग असते. "बिनचेह-याची संध्याकाळ " अगर " काजवा यांना आपण कथा म्हणतो ते या अर्थाने आणि इरावती कर्व्यांचे पुष्कळसे लेखन ललित निबंधांत मोडते ते यामुळेच"[६]

आशय आणि त्याचे निवेदन म्हणजेच निवेदकाची भूमिका यांच्यांत भिन्नत्व निर्माण झाल्यामुळे लघुकथा आणि ललितनिबंध हे दोन वेगळे साहित्यप्रकार मानावे लागतात, जरी ते कथानात्मक वाङ्मयात मोडले तरी ।

कथेत - कादंबरीत " मी " आशयात विरघळून जातो. ललित निबंधात " मी " मी राहतो. आशय आणि मी अलग राहतात.

लघुनिबंधाची बीजे -मराठीत की इंग्रजीत ?

अर्वाचीन मराठी वाङ्‌मयाच्या अनेक इतिहासांत विविध वाङ्‌मयप्रकारांचा चिकित्सक आढावा घेण्यात आलेला आहे. त्यांत लघुनिबंध, ललितगद्याचा आढावाही आहेच. १९२६ ला मराठी निबंधाने " लघुनिबंधा"चे जे नवे वळण घेतले, त्याची बीजे पूर्वीच्या निबंधात आढळतात, असे आग्रही प्रतिपादन अनेक आढाव्यात केलेले आहे. प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी लघुनिबंधाची जी वैशिष्टये सांगितली जातात, ती पूर्वीच्या निबंधकारांत कशी दिसून येतात याचे सोदाहरण विवेचन केलेले आहे ( प्रदक्षिणा ७ वी आवृत्ती १९८० ). असाच प्रयत्न वि. स. खांडेकरानीही पारिजात ( १९७२) च्या प्रास्ताविकात केलेला आहे. प्रा. वि. बा. आंबेकर यांची भूमिका पण अशीच दिसते. ( तरंग आणि तुषार १९७०).

जे जे नवीन ते आपल्या जुन्या त होते किंवा आहे असे म्हणण्याच्या अट्टाहासाला कुणी प्रतिबंध करू शकत नसले, तरी ते म्हणणे साधार, सर्वांगपरिपूर्ण आणि तर्कशुद्ध असणे आवश्यक आहे. वाङ्‌मयव्यवहारात " बीजे " आढळण्याचा प्रकार सार्वत्रिक आणि सार्वदेशिय आहे. म्हणून कांही पूर्वीच्या निबंधातून " लघुनिबंध " मराठीत आला असे म्हणता येत नाही. पूर्वीच्या निबंधाचा आशय, निबंधकाराची भूमिका ही सर्वस्वी लघुनिबंधाहून वेगळी होती. त्यांना आपण " लघुनिबंध" लिहित आहोत. याची जाणीवही नव्हती. त्यांची भूमिका वैचारिक आणि वस्तुनिष्ठ

होती. हे " लघुनिबंधा"च्या प्रकृतीशी पूर्णपणे विसंगत आहे, हेच सत्य आहे०

ललित गद्याचे उपप्रकार

पारंपरिक निबंध हा " वस्तुनिष्ठ " तर लघुनिबंधाचा सारा भार आत्मनिष्ठे वर. आत्मनिष्ठा म्हणजे " मी " चा आविष्कार, सहजसुंदर " लालित्या"ची उधळण करणारा० हया " मी " चे सौंदर्यरूप आविष्कार किती विविध त-हेन्चे असतात हे लघुनिबंधाच्या अवतारावरुनच कळले. आज कथा, काव्य, नाटक आणि कादंबरी या चार प्रमुख वाङ्‌मयप्रकाराहून इतर सारे लेखन हे, ललित गद्य " या सदरांत मोडले जाते. पण एकेकाळी लघुनिबंधा"चा स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून विचार केला जात असे. याचे कारण म्हणजे त्यांतील देखणा आत्मनिष्ठ आविष्कार. पण पुढे पुढे हा आत्मनिष्ठ आविष्कार विकसित आणि व्यापक रूप घेऊ लागला. हा आविष्कार स्वतःच्याच चौकटी मोडू लागला. वैविध्याने नटू लागला. या भिन्न आविष्कारांना पोटप्रकारांची नांवे मिळाली. अशा रीतीने लघुनिबंध, ललितनिबंध, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, स्मरणे आणि आठवणी, आत्मचरित्र, आत्मनिष्ठापर वैचारीक लेखन आणि विनोदी लेखन इ. गद्याचे उपप्रकार आज " ललित गद्य " या एका व्यापक संज्ञेखाली गणले जातात. पण एक गोष्टी खरी-आज मान्यताप्राप्त ललितनिबंधाचे मूळ ना. सी. फडकेप्रणित " गुजगोष्टी "त आणि गुजगोष्टीचे मूळ " अल्फाऑफ दि प्लाऊ " ( मूळ नांव - गार्डीनर ) च्या इंग्रजी निबंधात ।

गार्डीनरचा " पर्सनल एसे "

पहिल्या महायुध्दानंतर इंग्लंडमध्ये वृत्तपत्रांची आणि नियतकालिकांची झपाटयाने वाढ झाली. वाचकांची " चटकदार" मजकुराची मागणी वाढत चालली. टाइम्स, मॉर्निंग पोस्ट, डेली टेलीग्राफ, डेली मेल, मॅंचेस्टर गार्डीयन या वृत्तपत्रानी वाचकांची ही मागणी पुरी

करण्याचा सपाटा चालविला. या नियतकालिकांतून प्रसिध्द होणाऱ्या गोष्टी, लघुनिबंध, लेख, नंतर पुस्तकरूपाने प्रसिध्द करण्याची परंपराही पडली. सुखलोलुपता आणि रिकामा वेळ यामुळे लोकांना " कलात्मक " वाङ्मयाची गरज भासू लागली. काय सांगायचे येथपासून कसे सांगायचे येथपर्यंत सर्वच बाबतींत लोकांना नावीन्य, रम्यता, चातुर्य, आणि आधुनिक पध्दत हवी होती. लोकांच कल अर्थगर्भ, प्रसादपूर्ण पण चटकदार अशा भाषेकडे होता. म्हणूनच युध्दोत्तर इंग्लंडमध्ये दीर्घ वाङ्मयप्रकार मागे पडून त्रुटित लहान आणि डोक्याला शीण न देता हृदयाला आनंदित करतील असे वाङ्मयप्रकार जन्म पावले. नित्य परिचयाच्या जीवनांतील अगदी उपेक्षणीय विषयही वाङ्मयाच्या प्रांतात झपाटयाने शिरले. त्यांचा प्रवेश एखाद्या स्वप्नसुंदर नर्तिकेसारखा लालित्यपूर्ण, आकर्षक आणि चित्तवेधक बनविण्यांत आला. त्यावेळच्या इंग्लंडमधील जीवनप्रवाहाविषयी आणि नव्या लेखनाविषयी प्रा. वि. बा. आंबेकर लिहितात " सांस्कृतिक जीवनांत बारीकसारीक संवेदनांना, हालचालींना आणि उपेक्षणीय गोष्टीनाही फार महत्व आहे हे समाज नव्याने पटवून घेऊ लागला. कोणतीही शिकवण हसत खेळत दिली पाहिजे आणि घेतली पाहिजे, किंबहुना हसत खेळतच सारा जीवनव्यवहार चालला पाहिजे. आणि तो तसा चालतांना सौंदर्यपूर्ण आणि कलात्मक बनला पाहिजे, असा दंडक त्यांच्या सामाजिक जीवनांत नकळत निर्माण झाला.... संबंध जीवनाचा एखादा तत्वज्ञान्याप्रमाणे विचार करुन खल करीत बसण्यापेक्षा आता जे चालले आहे तेवढयापुरते बोलावे असे वाटणे हा या जीवनप्रवाहावील धांदलीचा आणि धावपळीचा परिणाम आहे. शिवाय हजारो वर्षे चालत आलेले तत्वज्ञानात्मक विचार शंकास्पद वाटतात ते निराळेच. पण यामुळे लेखकाच्या अंतरंगात दडलेल्या खऱ्याखुऱ्या वास्तविक आणि नैसर्गिक भावना बाहेर पडू शकतात. म्हणूनच आजच्या निबंध लेखकाला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

" उपेक्षणीय वस्तूचा संग्राहक " किंवा " शेकोटीजवळचा गोष्टी वेल्हाळ तत्वज्ञानी" असे यथार्थपणे संबोधण्यात येते. गार्डीनर, चेस्टरटन् बेलॉक, ल्यूकस् " बिरेल, लिंड, मॅक्स, बीरबॅाम, इत्यादि लेखकांत या सा-या गोष्टी आढळून येतात." [७] म्हणजे युध्दोत्तर इंग्लंडमधील बदलता जीवनप्रवाह आणि नव्या लेखनोन्मीर्ष यांतूनच गार्डीनरचा नवा Personal Essay इंग्रजीत अवतरला. पर्सनल एसे " म्हणजे आत्मनिष्ठ निबंध " पूर्वीच्या 'एसे' हून पूर्णतया वेगळा ।

गार्डीनरने " अल्फा ऑफ दि प्लाऊ " या टोपण नांवाने अनेक निबंध लिहिले. अनेक " सामान्य, हलक्याफुलक्या विषयांना त्याने कलात्मक साज चढविला. झोपल्या झोपल्या वाचणे, प्राण्यांची संगत, आत्मगत बोलणे असे सामान्य विषयही गार्डीनरला चालत, गार्डीनरची शैली एकदम घरगुती - वाचकाला जवळिक निर्माण करणारी, वर्णने चतुराईची, शब्दसंपत्ती भावनात्मक, मनाच्या अनेक संवेदनांची हळुवार नोंद, अशाश्वतांतील शाश्वत टिपण्याचे कसब इ. गोष्टीमुळे पर्सनल एसे " चे जनकत्व आपोआप गार्डीनरकडेच गेले. लोक भावना जपतात. पण त्यांतील तोकडेपणा जाणत नाहीत. हा तोकडेपणा चेस्टरटनने विदारक पध्दतीने, तीव्र उपरोधाने आपल्या नव्या निबंधातून मांडला. बेलॉकने नव्या भाषाशैलीच्या द्वारे वाचकांना विविध विषयांतून फिरवले. बिरेलने आपल्या निबंधातून हास्याचे भूईनळे उडविले. लिंड तर भोवतालच्या सामान्य वस्तू आणि व्यक्तीशी तद्रूप होत होता . असा हा गार्डीनरचा Personal Essay महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत आला आणि मराठी निबंधाची दिशाही बदलली ।

लघुनिबंधाचे आगमन

ज्यांना आज आपण प्रमुख वाङ्.मयप्रकार म्हणतो ते कथा किंवा कादंबरी सारखे वाङ्.मयप्रकार, इंग्रजीच्या अभ्यासामुळेच आपल्याला परिचित झाले. लघुनिबंधही याला अपवाद नाही. इंग्रजीत मान्यताप्राप्त झालेले

गार्डीनर आणि त्याचे समकालीन लेखक आमच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमांत आले. त्यांचा अभ्यास होऊं लागला. गार्डीनरच्या "पर्सनल एसे" ने आमच्या लेखकांचे लक्ष आकृष्ट केल्यासंबंधी लघुनिबंध-क्षेत्रात भरीव कार्य केलेले वि. स. खांडेकर लिहितात - " विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत गार्डीनर ( आल्फा ऑफ दि प्लाउ ) सारख्या नवीन पध्दतीने निबंध लिहिणा-या इंग्रजी लेखकांचा झालेला समावेश. मराठी लेखकवर्गाला तत्पूर्वी परिचित असलेल्या इंग्रजी निबंधाहून गार्डीनरचे निबंध सर्वस्वी भिन्न होते. नव्या निबंधकाराला कुठलाही विषय चालतो, टोपी ठेवायला एखादी खुंटी लागते त्याप्रमाणे आपले व्यक्तित्व प्रकट करण्याकरिता निबंधकाराला कुठलातरी विषय घ्यावा लागतो. इतकेच त्याचे महत्व असते., हे गार्डीनर व त्याच्याच जोडीचे आणि तोडीचे ल्यूकास, लिंड वगैरे अन्य निबंधकार यांच्यावरून सहज दिसून येण्याजोगे होते"[८] खांडेकरांच्या हा अभिप्राय वस्तुस्थितीदर्शक आहे.

अनंत काणेकर यांच्या " पांढरी शिडे " या पुस्तकाला लिहिलेल्या प्रास्ताविकांत हाच मुद्दा खांडेकर पुन्हा मांडतात. त्यांचे म्हणणे असे " फडक्यांच्या गुजगोष्टींचा उगम जसा त्यांच्या सौंदर्यनिष्ठ वृत्तींत होता, तसाच तो त्या काळच्या वाङ्.मयविषयक परिस्थितीतही होता. " रत्नाकर" या तत्कालीन अग्रगण्य मासिकाचे फडके संपादक होते. त्या मासिकांतून रसिकांना वाङ्.मयाच्या नव्या नव्या परी सादर करणे त्यांना आवश्यक होते. त्याचवेळी इंग्रजीतला आत्मनिष्ठ प्रकारचा निबंध ( ) गार्डीनर, लिंड, ल्युकास, चेस्टर्टन, वगैरेंच्या वाङ्.मयाच्या द्वारे आपल्याकडे परिचित होऊ लागला होता. तत्कालीन विद्यार्थ्यांकडून गार्डीनरची पुस्तके अभ्यासिली जात होती. लिंड, चेस्टर्टन, बेलॉक वगैरेंच्या निवडक लघुनिबंधाचे एक पुस्तक त्या वेळच्या इंटरच्या अभ्यासक्रमात पाहिलेले मला आठवते. हा नवा आत्मपरनिबंध आकाराने लहान आणि वाचनाच्या दृष्टीने चटकदार होता. जुन्या निबंधापेक्षा

तो स्वभावत:च अधिक रंजक व कथेशी जवळचे नाते असलेला होता"[९]

म्हणजे इंग्रजीतल्या आत्मनिष्ठ निबंधाने विद्यापीठीय अभ्यासक्रमाच्याद्वारे मराठी लेखकांना भुरळ घातली आणि लेखकाचा आत्मविष्कार, विषय कोणताही, विषयाच्या अनुषंगाने लेखकाची मनोविलसिते (a loose sally of the mind – Johnson) रचनासौष्ठव, भाषासौंदर्य, अलंकार वैभव, सौंदर्यदर्शन आणि जमल्यास जाताजाता तत्वचिंतन इ. गुणविशेषांनी युक्त असलेल्या लघुनिबंधाला मराठीने स्वीकारले.

## लघुनिबंधाचे स्वरूप व विशेष

मराठीतील लघुनिबंधाचा प्रारंभ " गुजगोष्टी " या नांवाने सुरु झाला. " रत्नाकर" मासिकाच्या जानेवारी १९२६ च्या अंकांत " सुहास्य " नांवाची " गुजगोष्ट " ना. सी. फडके यांनी लिहिली. ते लिहितात— " रत्नाकर" मासिकाच्या वाचकांना नित्य कांहीतरी नवं चटकदार लालित्यपूर्ण असं वाचायला देण्याची माझी धडपड होती. या तळमळीमुळे मी नित्य नव्याच्या शोधात होतो. या माझ्या शोधातच मला नवा मराठी निबंध सापडला ! कित्येक इंग्रजी लेखकांचे चटकदार लघुनिबंध माझ्या वाचनांत आले होते. ते वाचून मला वाटू लागले. असं काहीतरी मराठी वाचकांना द्यायला हवं आणि या इच्छेच्या पोटी " सुहास्य" या माझ्या पहिल्या आणि मराठीतल्याही पहिल्याच लघुनिबंधाचा " " रत्नाकर " मासिकांत जन्म झाला"[१०]

म्हणजे " गुजगोष्टी "ची मूळ प्रेरणा इंग्रजीच॰तथापि या प्रेरणेला फडके यांनी असा कांही मराठी साज आणि बाज चढविला, की अनुकरणांतून आलेला हा लेखनप्रकार कांही वर्षांनी स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून स्थिरावला पुढे ललित निबंध म्हणून अधिक विकसितही झाला. " गुजगोष्टी " या नांवावरुनच या लेखनप्रकाराची सहज कल्पना येते. समोरासमोर बसून आपण आपल्या मित्रासमोर कांही लपवत-छपवत नाही, मोकळेपणाने बोलतो, तद्वतच लेखक या निबंधाद्वारे आपल्या रसिकांना

विश्वासांत घेऊन त्यांच्याशी कांही हितगुज, गप्पागोष्टी करीत असतो. हे एकप्रकारचे लेखकाचे आत्मनिवेदन असते. त्या निवेदनांत विषय प्रतिपादनाला, त्याच्या मुद्देशीर मांडणीला, साधक बाधक विचारांना महत्व नसते. तेथे खरे महत्व लेखकाच्या आत्मप्रकटीकरणाला, आत्माविष्काराला असते. भावगीत हे जसे आत्मनिष्ठ असते, तसे गद्यातील हा एक आत्मनिष्ठ लेखनप्रकार आहे. वि. पां. देऊळगावकर लिहितात - " वस्तुनिष्ठ निबंधात विषयाच्या मुद्देसूद प्रतिपादनाला, मतप्रदर्शनाला, पांडित्यप्रदर्शनाला महत्व असते, तर या गुजगोष्टीत ( लघुनिबंधात) हा कोणताच हेतू असत नाही. विषयापेक्षा गुजगोष्टी करणा-या व्यक्तितच वाचकांना गोडी वाटावी अशा त-हेचे स्वरूप या गुजगोष्टीचे असते. या लेखनप्रकाराला विषयाचे बंधन नाही. ज्या विषयासंबंधी लिहावयाचे त्याचे सुध्दा पूर्ण ज्ञान लेखकाला असण्याची गरज नाही. किंबहुना, आपण त्या बाबतीत किती अज्ञानांत आहोत हे सांगण्यासाठी सुध्दा तो एक लेख लिहील व ती उत्कृष्ट गुजगोष्ट" होईल. " " गुंजगोष्ट " हे अर्थपूर्ण नांव देऊन ना. सी. फडके यांनी हा प्रकार मराठीत खूप लोकप्रिय केला. पुढे त्यानीच लघुनिबंध, " ललित-निबंध " अशीही नावे रूढ केली. आता हीच रूढ आहेत".[११]

मराठीतील लघुनिबंधाचे जनक ना. सी. फडके, लघुनिबंधाचे स्वरूप सांगतांना गुजगोष्टी"च्या तिस-या आवृत्तीच्या " प्रस्तावने"त म्हणतात " या लेखनप्रकारांत मार्मिक विचारास अवकाश असतो, पण एखाद्या विषयाचा सांगोपांग विचार करण्याची खटपट केली तर ती सौंदर्यविघातक ठरते. तसेच या लेखनप्रकाराची शोभा उपमालंकारा वाचून प्रकट होत नाही, पण काव्याचा अतिरेक त्यांस यत्किंचितही खपत नाही....... जी वस्तू लोकांच्या सामान्य दृष्टीस क्षुद्र अगर उपेक्षणीय वाटत असेल तिच्याविषयीच बोलायला लागून तींत सौंदर्य असल्याचे पटवून द्यायचे, असे तारतम्य ठेवले, की विषय निवडण्याचे काम सोपे होईल... चमत्कृती हा गुजगोष्टीचा आत्मा होय. ही चमत्कृती विषयाच्या निवडीत

असावी ., किंवा त्यांत असेल तर गोष्टीच्या ओघात आणावी म्हणजे असे की, अगदी साध्यासुध्या गोष्टी विषयी बोलता बोलता त्यांत अचानक एखाद्या मोठ्या तत्वावर प्रकाश पाडल्यासारखे करावे... पण गुजगोष्टीतील या चमत्कृतीपेक्षाही अधिक महत्वाचे तंत्र म्हणजे तिच्यात प्रकट होणारी वृत्ती आणि तिची भाषा. गुजगोष्ट लिहिणाराने अशा वृत्तीने लिहिले पाहिजे पाहिजे, की जणू आपण व वाचक यामध्ये ' कांही परकेपणा नाही., आपल्या अनुभवाच्या ब-यावाईट गोष्टी., आपण केलेली सत्कृत्ये, आपल्या हातून घडलेल्या चुका, आपल्या आवडीनिवडी, खोडी लहरी, सारे कांही निवेदनाच्या ओघांत येईल तसे येऊ द्यायचे अशी वृत्ती लेखकाने ठेवली पाहिजे. लेखक व वाचक यामधील अंतर जितके नाहीसे झाल्यासारखे गुजगोष्टीत वाटेल, तितकी ती सरस वठेल. अर्थात या वृत्तीला साजेशीच भाषा गुंजगोष्टीच्या लेखकाने योजिली पाहिजे, काव्याचे अलंकार न टाकता भाषा जितकी सुबोध, हलकी मनमोकळी, गमतीने बोलल्यासारखी ठेवता येईल तितकी गुजगोष्ट अधिक रंगेल" [१२]

वर फडके यांनी लघुनिबंधाचे ( त्यांच्या शब्दांत गुजगोष्टीचे ) जे स्वरूपविवेचन केले, आणि काही विशेष सांगितले, नेमक्या त्याच मार्गाने मराठीतला लघुनिबंध गेलेला दिसतो.

" मी लघुनिबंध कां लिहितो ? यासंबंधी विवेचन करतांना आणखी एके ठिकाणी फडके लिहितात - " गुजगोष्टीसारखे हे लघुनिबंध मला लिहावेसे वाटतात त्याचं मुख्य कारण हे की कथा, कादंबरी नाटक या सर्वांपेक्षा या वाङ्‌मयप्रकारात आत्मप्रकटीकरणाला अधिक अवकाश आहे. लघुनिबंध लिहितांना मला स्वत:बद्दल लिहिता येतं.. सरळ सरळ स्वत:विषयी मला लिहिता येतं. माझ्या अंगचे गुणच नव्हेत तर दोषदेखील वर्णिता येतात.....लघुनिबंध म्हणजे लेखकानं स्वत:पुढे धरलेला आरसा, त्यांत दिसणा-या स्वत:च्या प्रतिबिंबाचे केलेलं वर्णन. ललित लेखकाला सृष्टीतले सर्वच विषय प्रिय खरे, परंतु त्यांचा सगळ्यात आवडता विषय कोणता ? तर " मी." या " मी " बद्दल मन:पूर्वक

लिहिण्याची संधी मिळते लघुनिबंधात -[१३]

१९२६ ते १९४५ पर्यंतच्या कालखंडात मराठी वाङ्‌मय - क्षेत्रात विविध वाङ्‌मयप्रकारांच्या प्रयोगशीलतेला बहर आलेला होता. लघुनिबंध हा त्यापैकी एक. फडके यांनी निष्ठेने या वाङ्‌मयप्रकाराला प्रतिष्ठा मिळवून दिली. वि. स. खांडेकर, वि. ल. बर्वे, अनंत काणेकर, ना. मा. संत, गं. भा. निरंतर, वि. पां. दांडेकर, भगवन्त देशमुख, मा. का. देशपांडे आणि कुसुमावती देशपांडे यानी हा वाङ्‌मयप्रकार समृध्दच नव्हे तर वाचकप्रियही केला.

तथापि १९४५ नंतर या वाङ्‌मयप्रकाराची वाढ खुंटून तो मृतप्राय झाला, आणि आपल्याच राखेतून जन्माला येणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे ललितनिबंध " सा रला.

लघुनिबंधाची -हासमीमांसा

फडके, खांडेकर, काणेकर यांनी जे लघुनिबंध लिहिले, ते इंग्रजी निबंध आपल्या समोर ठेवूनच, या सर्वांच्यात व्यक्तिपरत्वे भिन्नता होती ही गोष्ट खरी पण हे लेखन लघुनिबंध आहे एवढे ओळखण्याइतपत त्यांत सारखेपणाही होता. या संदर्भात प्रकाश कामतीकर यांच्या " स्वप्नगंधा" या लघुनिबंधसंग्रहाचे परीक्षण करताना प्रा. प्रसन्नकुमार पाटील लिहितात - " त्यांचे लघुनिबंध हे आपण लघुनिबंध आहोत याची " जाणीव " व्यक्त करतात. ( अपवाद करावयाचा, झाल्यास थोडया अंशी काणेकरांचा करावा लागेल. ) या जाणिवेमुळे लघुनिबंध या वाङ्‌मयप्रकारांतील चैतन्यच निघून गेले, जिवंतपणा गेला आणि उरले ते इंग्रजी तंत्र, लघुनिबंध हा जेव्हा आपल्या वेगळेपणाची जाणीव व्यक्त करतो, तेव्हा ती जाणीव कांही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत

उपयुक्त असली तरी, त्या वाङ्‌मयप्रकाराच्या सर्वांगीण वाढीस, समृध्दीस ती तारक न ठरता मारकच ठरते. १९३९ ते १९४५ पर्यंतच्या लघुनिबंधांचा अभ्यास करण्यास ही गोष्ट प्रत्यतरांला आल्याशिवाय राहणार नाही. फडके काय किंवा खांडेकर काय, यांना आपण लघुनिबंध लिहीत आहोत याची जाण होती. आणि त्यांचा लघुनिबंधही हीच त्यांची जाण व्यक्त करीत होता. परिणामी लघुनिबंधाची वैशिष्टये विषय कोणताही, खेळकर भाषाशैली, लेखन गप्पांच्या स्वरुपाचे, विषयांतील सुप्त सौंदर्यदर्शन आणि जमल्यास तत्वदर्शन, लेखन रंजक व्हावे म्हणून लेखकाच्या आवडीनिवडीचे रेखाटन, विनोद आख्यायिकांचा वापर वगैरे आकडेवारीत सांगता येऊ लागली. इंग्रजीतला वाङ्‌मयप्रकार मराठीत आणण्याच्या उद्‌देशाने हे लघुनिबंध लिहिले गेले. जाणीवपूर्वक प्रयत्न व कारागिरी यांच्या कात्रीत हा वाङ्‌मयप्रवाह सापडला. पर्यायाने त्याचा साचा बनला, तंत्र बनले., जिवंतपणा गेला आणि कृत्रिमपणा हे वैशिष्टय बनून गेले." [१४]

प्रा. पाटील यांच्या विवेचनावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की म्हणजे फडके यांनी लघुनिबंधाची म्हणून जी वैशिष्टये सांगितली, तीच त्याच्या -हासाला कारणीभूत झाली. फडक्यांची जी दोन अवतरणे वर उद्धृत केली आहेत, त्यांतील पहिल्या अवतरणांत स्वत: फडके यांनीच " तंत्र " हा शब्द वापरलेला आहे, ही गोष्ट चिंत्य आहे. दुस-या अवतरणांत " मी " च्या आविष्काराबद्दल ते लिहितात, हा आविष्कार जेव्हा सहज, स्वाभाविक आणि नैसर्गिकपणे होतो त्यावेळी कोणताही प्रश्न निर्माण होत नाही. पहिल्या कांही वर्षांत लघुनिबंधातील हा " मी " चा आविष्कार उत्स्फूर्त होता. पुढे मात्र हा " मी " " पोज " ( Pose ) घेऊन अवतरुं लागला. तेव्हा हा आविष्कार " नाटकी" वाटू लागला. लघुनिबंधाची वाढ कां खुंटली याचे हेही एक प्रमुख कारण आहे. डॅा. चंद्रकांत वर्तक आणखी काही कारणे सांगतात- " फडके हे जवळजवळ १९४० पर्यंत साहित्यांतील एक " परवलीचा शब्द " होते.

कथनात्मक साहित्यप्रकारांच्या बांधणीचे, रचनेचे त्यांनी आराखडे मांडले होते. बोलल्यासारखी वाटणारी भाषा या प्रकारामध्ये आणून त्यांनी साहित्याची गोर सजवली होती. या बांधणीचे, रचनेचे अनुकरण मराठी लेखक खूप आवडीने करीत होता. लघुनिबंधाबाबत बोलायचे तर एका अनुकरणात हे दुसरे अनुकरण मिसळले आणि थोडयाच काळांत " कृतक " लघुनिबंध लिहिला जाऊ लागला. त्यामुळे लघुनिबंध नटवा झाला. मनाची स्वैर क्रीडा गेली. क्रीडेचा नाटकी आविर्भाव तसेच खोटया तत्वचिंतनाचा आव मात्र उरला. परिणामी जितक्या भराभरा हा लघुनिबंध भराला आला तितक्याच भराभरा तो खुंटूनही गेला .[१५]

थोडक्यात लघुनिबंधाचे जे गुण तेच कांही वर्षांनी त्याचे दोष ठरले, आणि त्याचे पर्यवसान 'ललितनिबंध' या त्याच्या विकसित रूपांत झाले.

" गुजगोष्टी"ची 'परिपूर्ती'

१९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. याच सुमारास मराठी साहित्यविश्वांतही कांही परिवर्तने घडत होती. कथेनं कात टाकली. " नवकथेचा जमाना सुरु झाला. दुस-या महायुध्दानंतरची मराठी कविताही पार बदलून गेली. मर्ढेकरांच्या उदयाने मराठी कविता ताजीतवाणी" झाली " नवकाव्या"ने धमाल उडविली. पेंडशानी प्रादेशिक कादंबरीचे दालन उघडले. सगळीकडे जणू कात टाकण्याचा प्रकार सुरुं झाला. वाढ खुंटून साचा बनून राहिलेला लुघुनिबंध तरी कसा मागे राहील ? त्याच्या-तही फेरबदल झाले. तो ललितनिबंध या नांवाने ओळखला, उल्लेखिला, जाऊ लागला. लघुनिबंधाच्या आशयांत आणि अभिव्यक्तीत अर्थपूर्ण बदल झाले. तो आता ख-या अर्थाने " ललित " झाला, जीवनसन्मुख झाला. रचनेचे " संकेत " गेले, हृदयाचा " संवाद " आला. कारागिराचा तंत्रवाद" गेला आणि ऋषीमुनींचा " मंत्रवाद आला. 'गुजगोष्टी"ची 'परिपूर्ती' झाली.

१९४५ पूर्वीच्या लघुनिबंधात काही गोष्टी दखल घेण्याजोग्या निश्चितच होत्या. खांडेकरांची चिंतनशीलता लक्षणीय होती, काणेकरांची वैचारिक समाजसन्मुखता लोभावणारी होती, कुसुमावतींच्या काव्यात्मवृत्तीची भूल अविस्मरणीय, ना. मा. संतांची भावनिर्भरवृत्ती तर मनमोहकच....पण हे सारे त्या त्या लेखकाचे व्यक्तिवैशिष्ट्य होते. लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराचे ते सामान्यविशेष नव्हत.

हे व्यक्तिविशेष तंत्रवादाला रोखू शकले नाहीत. म्हणूनच तंत्राच्या चौकटींत न अडकता, आत्मनिष्ठ वृत्ती जोपासून लघुनिबंधाला ललितनिबंधाची पदवी प्राप्त करून देण्याचे श्रेय इरावती कर्वे यांना द्यावे लागते. लेखकाने स्वतःच्या आवडीनिवडी किंवा लकबी लेखनांतून सांगणे म्हणजे आत्मनिष्ठा नव्हे. जीवनाचा व्यामिश्रता जाणून घेण्याची जी लेखकाची कुवत, तीच त्याच्या लेखनाला समृध्द करते. ही लेखकाच्या व्यक्तिमत्वातील कुवत १९४५ नंतरच्या लेखनांत प्रकट होऊ लागली. पर्यायाने " लघुनिबंधाला 'ललितनिबंध " होणे अपरिहार्य होते !

## ललितनिबंध

स्वातंत्र्योत्तर काळांतील नव्या लघुनिबंधाचे दर्शन आपल्याला इरावती कर्वे यांच्या परिपूर्ती ( १९४९ ) या ललितनिबंध पुस्तकात घडते.

### १. सौंदर्यानुभव

ललितनिबंध जुन्या तंत्राच्या दबावाखाली राहिला नाही. त्याने स्वतःचा आकार शोधला. लेखनाच्या पूर्वनियोजित आडाख्यापेक्षा त्याने स्वतःची आंतरिक गरज ओळखली. विषयासाठी क्षुद्र वस्तू निवडणे, किंवा

विषय हलकाफुलका असल्याचा देखावा करण्याचे नाटक त्याने सोडून दिले. त्यामुळे ललितनिबंधाचे विषयक्षेत्र सर्वदूर पसरले. हेतुपूर्वक विषयांतर किंवा सोंग त्यात दिसत नाही. निबंधात लेखकाची अंतर्मुखवृत्ती

सर्वत्र दिसते. हा नवा निबंध बसकन घालून बसत नाही, थांबत नाही., जुन्यालघुनिबंधातील खोटया आविर्भावाच्या अभावी हा नवा निबंध अधिक गतिशील वाटतो. लघुनिबंधात एक ठोस विचार असावयाचा. नव्या ललितनिबंधात सौंदर्यानुभवाच्या आविष्काराला महत्व आले. त्यामुळे त्याचा Forma बदलला. लघुनिबंधातला " मी " एका भूमिके"चा आविष्कार करायचा. ललितनिबंधात " मी " च्या " अनुभवा"ला एका "व्यक्तिमत्वाचे अनुभव " म्हणून महत्त्व प्राप्त झाले. हा मुद्दा पटवून देतांना आनंद यादव लिहितात-" उगीचच " मी " चे राग, लोभ, इत्यादीमध्ये अवाजवी रमण्यापेक्षा व तेच शैलीदारपणे सांगण्यापेक्षा " मी " च्या व्यक्तिमत्वाच्या अधिक गंभीर बाजूकडे, अधिक शाश्वत रूपाकडे नवे ललितनिबंधकार वळलेले दिसतात. नव्या ललित निबंधाच्या भाषेला प्रतिमाशीलतेमुळे नवे सामर्थ्य लाभलेले दिसते. तसेच त्याला अनेक भाववृत्ती लाभल्या आहेत. जुन्या लघुनिबंधातील यांत्रिक हासरेपणा त्याने कधीच सोडून दिलेला आहे"[१६]

## २. चिंतनशीलता

आत्मनिष्ठा न टाकताही, ललितनिबंध " वैचारिक ललितरूप" धारण करु शकतो. यासंबंधी रजनी कोलारकर म्हणतात - - " ललितनिबंधात तर्काला प्राधान्य नसून भावनिकतेला प्राधान्य असते. तो व्यक्तित्वाचा हुंकार असतो. लालित्यपूर्ण शैलीतून प्रकटलेल्या या निबंधात विषयसापेक्षता असते. त्यातील विषय वाचक तर्कपातळीवर नव्हे तर भावनिक पातळीवर स्वीकारतो, पण जेव्हा एखादा ललित निबंध व्यक्तित्वाचा हुंकार असूनही त्या विशिष्ट विषयाच्याबाबतीत चिंतनशील बनतो आणि वाचकाच्या बुध्दीला व तर्काला

आव्हान देतो तेव्हा तो वैचारिक ललितरूप धारण करतो."[१७] इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, पूर्वीचे काणेकर इत्यादींचे निबंध कोलारकर बाईंच्या विधानाला पुष्टी देतात.

३. काव्यात्मता

१९५० ते १९७० पर्यंतच्या ललितनिबंधावर कविमनाच्या निबंध-कारांनी हुकूमत गाजविली आहे. या कालखंडातील अनेक लेखकांचे व्यक्तिमत्व तीव्र संवेदनाशील आहे, त्यामुळे त्यांच्या लेखनांत काव्यात्मकता आलेली आहे. अनुभवच मुळी ते काव्यात्मतेने प्रतिमाद्वारे घेतात. साहजिकच अनुभव समूर्त, सघन आणि सूचक होतात. अनुभवाच्या विविध भावावस्था बनतात. असे हे अनुभव निखळ स्वरूपात आविष्कृत होतात. आविष्कारासाठी वापरलेली भाषाही काव्यात्म बनते. संवेदनशील वृत्तीमुळे नवे सामासिक शब्द घडविले जातात. वाक्यरचना छोटी, छोटी, असते. प्रसंगी दीर्घ वाक्येही बनविली जातात. वाक्यांतील शब्द, त्यांचा क्रम, विरामचिन्हे या सर्वांचा वापर आविष्कारांतील तरलता पकडण्यासाठी, हवी तशी बदलून केल्या जातो. त्यामुळे भाषेची गद्यमयताच निघून जाते, उरते केवळ काव्यात्मता, यादृष्टीने दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर, गो. वि. करंदीकर, माधव आचवल. श्रीनिवास विनायक कुलकर्णी, ग्रेस, आनंद यादव, मधुकर यांचे ललितनिबंध वैशिष्टयपूर्ण म्हणावे लागतील. ललितनिबंधातील सूचकता, तरलता, हळुवारपणा, प्रतिमावेड, प्रतिमामागील भावसंदर्भ आणि त्यांचे संवेदना जागरण इ. सगळे घटक निबंधकाराच्या काव्यात्म वृत्तीची साक्ष देतात.

४. रमणीय स्मरणे

आणखी एका दृष्टीने लघुनिबंध आणि ललितनिबंध यांतील फरक सांगता येतो. लघुनिबंधकाराची भूमिका ही वाचकाच्या मनावर कोणते

तरी जीवनसत्य बिंबवण्याची असते आणि त्यासाठी तो काल्पनिक पात्रप्रसंगांची निर्मिती करतो. ही लक्षणे ललितनिबंधात अजिबात आढळत नाहीत.

ललितनिबंधाची रचना कोणत्या तरी जीवनसत्याच्या प्रकटीकरणासाठी केलेली दिसत नाही. पात्रप्रसंग, काल्पनिक नसतात उलट ती लेखकाच्या जीवनांत आलेली आणि म्हणून खरीखुरी असतात. ही पात्रे, या पात्रांच्या सहवासात आलेला लेखक, त्यांच्यातील भावसंबंध, प्रसंगवैशिष्टये आणि त्यांतून प्रकट होणारा जीवनानुभव हे सर्व सत्य असते. ही पात्रे लेखकाच्या भूतकालांत त्यांच्या निकटवर्ती आलेली असतात. प्रसंगातून प्रकट होणारा जीवनानुभव लेखकाच्या वैयक्तिक जीवनाशी संबंधित असतो आणि या जीवनानुभवाचे पृथगात्म स्वरूप हा लेखक लालित्याच्या सा-या शक्यता Possibilities पणाला लावून दर्शवीत असतो. हा जीवनानुभव लेखकाच्या भूतकालातला-बालपणातला असतो. साहजिकच हे अनुभव" आत्मनिष्ठ " होतात. लेखकाचा हा आत्माविष्कार गतकालीन जीवनांतील अनुभवाच्या "स्मरणा" चा असतो. " स्मरण" हीच या लेखनाची प्रेरणा असते. ही प्रेरणा लेखकाच्या वैयक्तिक जीवनांतील अनुभवाशी निगडित असते. या लेखनाचे स्वरूप निबंधाचे असते. त्यांत लालित्य असते, सौंदर्य असते.

आत्मचरित्राच्या ज्या अनेक प्रेरणा मानल्या जातात, त्यातील " स्मरण " ही एक प्रेरणा आहे. ही एकच प्रेरणा स्मरणजन्य ललित-निबंधाला आणि आत्मचरित्राला जोडणारी आहे. स्मरणे, आठवणी आणि आत्मचरित्र यांच्यातील सीमारेषा स्पष्ट करणे ही फार कठीण गोष्ट आहे. म्हणूनच डॅा. विलास खोले लिहितात-" कोणतीही आत्मचरित्रात्मक रचना काही प्रमाणांत कां होईना संस्मरणस्वरूप ( मेमॅायर ) असते आणि आत्मचरित्रात्मक तपशीलावाचून संस्मरणांची

उभारणी होऊ शकत नाही"[१८] डॉ. खोले यांचे म्हणणे खरेच आहे. ललितनिबधांत आठवणी, स्मरणे येतात. हे संस्मरणस्वरुप लेखन रेखीव धारदार, चुरचुरीत व रंजक स्वरुपाचे आढळेत. लेखकाच्या व्यक्तिमत्वांतील चौफेरपणावर, वेधकतेवर, तिरकसपणावर व शोधक बुध्दीवर या लेखनाचे बरेचसे यश अवलंबून असते. संस्मर णांत, आठवणीत एकप्रकारची संवेदनशील रमणीयता असते. विवक्षित काळांतील, घटनांतील, प्रसंगातील क्षणाबाबतची ओढ ( Nostalgia ) तेथे व्यक्त झालेली असते. स्वातंत्र्योत्तर कालांतील ललित गद्याचा बराचसा भाग या प्रकारच्या लेखनाने व्यापलेला आहे. तथापि या स्वरुपाचे लेखन व आत्मचरित्र यांत निश्चितच भेद आहे.

आत्मचरित्रांत आत्मचरित्रकाराचा जीवनेतिहास असतो. काळ आणि घटना यांचा अनुभव सांधलेला असतो. अनेक प्रकारच्या पुराव्याच्या साधनांनी त्या जीवनेतिहासाला खरेखुरे रुप प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केलेला असतो. " सत्याभासांला आत्मचरित्रांत अतिशय महत्व असते. प्रामाणिकपणा, सत्याभास आणि आत्मगौरवहीनता यामुळे आत्मचरित्राला " प्रामाण्य " लाभते. जीवनेतिहासातील सलगता, सुसूत्रता, प्रामाण्य, विलक्षण अनुभव आणि आत्मचरित्रकाराचे समाजातील स्थान यावर आत्मचरित्राचे बरेचसे यश अवलंबून असते. संस्मरणजन्य लेखनांत "स्मरणे" आढळतात, आत्मचरित्राची इतर वैशिष्टये आढळत नाहीत. आणि त्यांची आवश्यकताही नसते. कारण या लेखकाना आत्मचरित्र लिहावयाचे नसून, गतकाळांतील कांही रमणीय स्मरणे ललित स्वरुपांत वाचकापुढे ठेवावयाची असतात. या लेखनांत लेखकाचा "आत्माविष्कार" असतो पण आत्मचरित्र " नसते.

" आत्मनिष्ठा" न सोडता, लघुनिबंधाचा साचा आणि कृतकपणा टाकून देणा-या या ललितनिबंधात तरल संवेदना, उत्कटभावना, तर्काला काडीमोड न देता तत्वाविषयी जिज्ञासा बाळगणारे विचार, भावांची व निसर्गाची बदलती रुपे, ॠतूंचा लावण्यविलास आणि ते वेटिपणारे कुतूहल, रंग, रुप, रस, गंध आणि स्पर्श या सर्व संवेदनाचे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

भान आणि प्रातिभपाखराच्या काव्यभराऱ्या यांची दिवाळी थाटलेली दिसते. एवढेच नव्हे तर प्रा. म. द. हातकणंगलेकर ललित गद्याला जी कसोटी लावतात, त्या कसोटीलाही हे लेखन तंतोतंत उतरत असल्याचे आज दिसत आहे. त्यांच्या मते " ललितलेखन हे मूलत: आत्मरंगानी बहरलेले लेखन असते. हे आत्मरंग किती गाढ आणि ताजे, किती संवेदनातत्पर व हळुवार आणि व्यक्तिगत असून देखील किती प्रमाणांत जीवनाची सनातन स्पंदने स्वीकारणारे आहेत, यावरच या लेखनाची सार्थता व गुणवत्ता अवलंबून असते" [१९]

इरावती कर्व्यांचे " परिपूर्ती " ( १९४९), " भोवरा" ( १९६० ) " गंगाजल " ( १९७६), दुर्गा भागवतांचे " भावमुद्रा" ( १९६० ), " व्यासपर्व " ( १९६०), " पैस " ( १९७०), करंदीकरांचे स्पर्शाची पालवी " ( १९५८), " आकाशाचा अर्थ " ( १९६५), माधव आचवलांचे " किमया" ( १९६१), ग्रेसची चर्चबेल " ( १९७४), " मितवा" ( १९८७), श्रीनिवास कुलकर्णींचा " डोह " ( १९६५), विजय तेंडुलकरांचे " कोवळी उन्हे " ( १९७१), शरच्चंद्र चिरमुल्यांचे " वास्तुपुरूष " ( १९८६), सरोजिनी वैद्य यांचे " पहाट पाणी" आणि आनंद यादव यांचा " स्पर्श-कमळे" ( १९७८), ही पुस्तके म्हणजे ललित निबंधाची पर्वतशिखरे आहेत.

## प्रवासातील अनुभवांची पुनर्निर्मिती

लघुनिबंध किंवा ललितनिबंध या ललित गद्यापेक्षा " मी " चा अधिक संबंध प्रवासवर्णनांत येतो.

एका " मी " ने केलेला हा प्रवास असतो, आणि त्याच " मी " ने केलेले त्याचे वर्णन असते. प्रवासवर्णनांत प्रवासातल्या विविध अनुभवांचे निवेदन येते, कथन येते. अशा या कथनाला लालित्य केव्हा येते?" डॉ. चंद्रकांत वर्तक म्हणतात "- ते कथन करतांना प्रवासवर्णनकाराला कल्पनेने

मनाने पुन्हा सगळा प्रवास करावा-जगावा लागतो. प्रवासांतील अनुभवांचा पुन:शोध आणि शब्दावाटे त्यांची करावयाची असलेली पुनर्निर्मिती, पुनर्रचना ही प्रक्रिया प्रवासवर्णनाला लालित्याच्या दिशेने नेते."[२०]

आपण केलेल्या प्रवासाची वा पाहिलेल्या दृश्यांची जंत्री देणे म्हणजे प्रवासवर्णन नव्हे, तर त्यांतून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार व्हायला हवा. स्थळ, एकच असले तरी वेगवेगळे प्रवासवर्णनकार ते वेगवेगळया त-हानी अनुभवतात.प्रत्येकांची क्षमता, अनुभवाची पद्धत, आणि संवेदना वेगळया पडतात. त्यामुळे त्या स्थळांतील सौंदर्य वेगळ्या त-हेने आविष्कृत होते. हे व्यक्तिमत्व वर्ज्य विषयाच्या अनुरोधाने आविष्कृत होते. प्रवासवर्णनांत लेखक कोठली भूमिका घेऊन वर्ण्य विषयाचे वर्णन करीत नाही. त्यामुळे हे प्रवासवर्णन भावनाशील, रसिक, गूढ, संवेदनाभारित, सौंदर्यपूर्ण असे विविध विशेषांनी युक्त बनू शकते. प्रवासवर्णने प्रवास संपल्यावर, आठवणी ताज्या असतांना लिहिली जातात. कधी कधी प्रवासाचा काळ व लिहिण्याचा काळ यामध्ये अंतरही पडू शकते. प्रवासांतील अनुभव स्मृतींच्या स्पाने पुन्हा आस्वादिले जातात. प्रवासर्णनात आणखी एक बाब महत्वाची आहे. लेखकाच्या व्यक्तित्वाला जसे महत्व असते, तसेच प्रवासभूत स्थाळालाही एक व्यक्तिमत्व असते. परंपरा, संस्कृती आणि इतिहास यांच्या संचितात ते " स्थळ " उभे असते. स्थळाचे हे व्यक्तिमत्व प्रवासवर्णनकाराच्या संवेदनशील मनाला स्पर्श करते. दोहोत एक विलक्षण भावसंबंध निर्माण होतो. हा भावसंबंधच प्रवासवर्णनाला ललितरूप" देतो. माडगांवकर, गोडसे भटजी, पावगी, न. चि. केळकर, गो. चि. भाटे, अनंक काणेकर, गंगाधर गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, पु. ल. देशपांडे, श्री. भि. जोशी इ. नावे आपल्याला प्रवासवर्णनाच्या संदर्भात ठळकपणे घ्यावी लागतात.

" स्केच" मधील कलात्मकता

" व्यक्तिचित्रा" लाही लालित्य येते. अशी ललित व्यक्तिचित्रे मराठीत खूप वाचावयास मिळतात. तेव्हा ललित गद्याच्या संदर्भात यांचाही थोडा विचार करावा लागतो. व्यक्तिचित्रातही लेखक " मी " येतोच. लेखकाला चित्रीभूत व्यक्ती जशी समजली किंवा जाणवली तशी तो शब्दावाटे " व्यक्तिचित्रा-" त साकार करीत असतो. चित्रकार रेषानी एखादे चित्र काढतो. व्यक्तिचित्रकार शब्दानी एखादे व्यक्तिचित्र रेखाटतो. रेषांची जागा शब्द घेतात. रेषांनी स्केच-वजा चित्र काढले जाते. पोर्ट्रेट नव्हे. व्यक्तिचित्रही असेच शब्दाद्वारे काढलेले " स्केच " असते पण पोट्रेट" नसते. व्यक्तिचित्रांत " मी " असणे म्हणजे त्या व्यक्तिचित्रकाराला व्यक्ति बद्दल जे जाणवले " ते शब्दांकित करणे होय. व्यक्तिचित्रे ही ख-याखु-या किंवा काल्पनिक व्यक्तीवर असू शकतात. व्यक्तिचित्रकार कल्पित व्यक्तिसंदर्भात कांही स्वातंत्र्य उपभोगू शकतो. व्यक्तिचित्र यांतील व्यक्तिचित्रण आणि चरित्र किंवा कथाकादंबरीतील व्यक्तिचित्रण यांत फरक आहे. कथेतील व्यक्तिचित्रणाला त्या कथेच्या संदर्भात समग्रता आणि पूर्णता आलेली असते. कादंबरीत तर व्यक्तीच्या उभ्या आयुष्याचा कॅनव्हास असतो. तेथे एखादद्दुस-या घटनेने भागत नाही. चरित्रांत समग्र आयुष्याचा विचार असतो. म्हणून कथा - कादंबरी किंवा चरित्र मधील व्यक्ति-चित्रण हे पूर्ण " पोट्रेट " असते, स्केच नसते. उलट " व्यक्तिचित्र " " स्केच " असते. त्यामुळेच व्यक्तिचित्राला ललितगद्यांत स्थान द्यावे लागते. कांही म्हातारे व एक म्हातारी " ( धाटे ) " गणगोत " ( पु. ल. देशपांडे, " रूपरंग " ( दुर्गा भागत ), आवडलेली माणसे, ( पुंडलिक) " युगान्त " ( इरावती कर्वे ), इ. पुस्तके चांगली व्यक्तिचित्रे म्हणून मान्यता पावलेली आहेत.

## दोन मते

" संवेदनशीलता ही एकच असते. फक्त ती अनेक आकारामध्ये प्रकट होते, असे हेन्री डेव्हिड थोरो याने म्हटले आहे. आजच्या ललित लेखनाचे स्वरूप पाहिले की त्यांची सत्यता पटते. ललित लेखनात 'मी' हा नेहमीच महत्त्वाचा घटक असतो. भोवतालच्या जगाचे वस्तुनिष्ठ आकलन, विश्लेषण केले तर ते वैचारिक लेखन ठरेल. ललित हे विशेषण लावायचे तर हे आकलन आत्मनिष्ठ असले पाहिजे आणि त्यांत नुसता बौध्दिक आत्माविष्कार असून भागणार नाही, तर असे लेखन भावगर्भही असले पाहिजे. संवेदनशीलतेचा हा धागा कालच्या आणि आजच्या ललित लेखनांत सारखाच आहे"[२१] असे श्री. दीपक घारे यांनी '१९९० मधील ललित लेखन' या लेखात म्हटले आहे, त्याशी वरील विवेचन पाहिल्यानंतर सहमत व्हायला हरकत नाही. कारण लघुनिबंध -ललितनिबंध -प्रवासवर्णन आणि व्यक्तिचित्र यांना कलात्मकता येते, ती या संवेदशीलतेमुळे० अनुभव भावगर्भ बनतात, त्यांना उत्कटतेची पातळी येते आणि लेखन काव्यात्म बनते. पण कांही ललित लेखक अतिशय मृदु, हळव्या अंत:करणाचे असतात. त्यांची संवेदनशीलताही मग थोडीशी भडक, अतिव्याप्त आणि भावविवशतेकडे झुकू लागते. अशा प्रकारच्या लेखनांतील काव्यात्मतेवर आक्षेप घेतला जातो. करंदीकर, पाडगांवकर, दुर्गा भागवत यांच्या लेखनांत कधीकधी हा काव्यात्मतेचा Over dose होतो. व्यक्तिमत्वाच्या सहजाविष्काराऐवजी लालित्य व काव्यात्मतेचा संकेत वापरून वाचकाला संमोहित करणा-या गो. वि. करंदीकरांच्या " वाङ्मयीन व्यक्तिमत्वा"चा उल्लेख डॉ. चंद्रशेखर जहागिरदार यांनी केला आहे.[२२] जहागिरदार यांच्या मते

हे ललितलेखक भाषेच्या लालित्याला शरण जातात. पर्यायाने तेथे व्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिमत्व जीवनाशी संबद्ध नसते, अशी जहागिरदारांची भूमिका आहे. गतकालीन जीवनाबद्दल कधीही न संपणारी जी ओढ या ललितलेखनात व्यक्त होते, त्याबद्दलही जहागिरदार तक्रार करतात. " ललित गद्याच्या या एकूण परंपरेलाच समकालीन वास्तवाचे वावडे कां असते ?"[२३] असा त्यांचा प्रश्न आहे. याबद्दल असे म्हणतां येईल.इरावती कर्वे, दुर्गा भागवत, माधव आचवल, श्री. वि. कुलकर्णी, किंवा करंदीकर यांच्या ललितलेखनांत केवळ त्यांचे 'वाङ्.मयीन व्यक्तितत्व"च प्रकट होते, कां आणखी?" प्रत्येक माणसाला एक भूतकाळ असतो - एक बालपण असते - त्याच्या रमणीय हव्याहव्याशा स्मृती असतात. त्यांची ओढ वाटणे नैसर्गिक आणि निरोगी आहे. आठवणी जपणे - आठवणीत रमून जाणे हा माणसाचा सहजसुंदर छंद आहे. आठवणींचा ठेवा हा त्याच्या अस्तित्वाचा भाग असतो. तेव्हा ह्या ओढीपासून माणसाला दूर करणे कर्मकठीण गोष्ट आहे. स्वप्न हेही जसं एक वास्तव असतं, तसं आणि तेवढंच पूर्वस्मृतीची ओढ हेही एक वास्तव असतं.

## समारोप

अव्वल इंग्रजीतल्या बालबोध गद्याला चिपळूणकरांच्या निबंधाने लालित्याचा साज चढविला, फडक्यांच्या कलासक्त मनाने त्याला मयूरसिंहासनावर बसवले आणि इरावती, दुर्गाबाईंच्या जीवनसन्मुख चिंतनशील वृत्तीच्या लेखनाने त्याला अशाश्वतांतील शाश्वत सौंदर्याचा साक्षात्कार घडवला.

रांगणारे " गद्य " " निबंध " झाले, निबधांचा " लघुनिबंध" झाला. " वस्तुनिष्ठा " जाऊन " आत्मनिष्ठा" आली. निबंधाचा विकार झाला. घडी मोडावी लागली. निबंधाची घडी फडके यांनी मोडी मोडली. लघुनिबंधाची घडी इरावतीबाईनी मोडली. ललित-निबंध अवतरला.

हे होत असतांनाच लेखकांतला " मी " वेगवेगळया दिशानी आविष्कृत होऊ लागला. कधी " तो " प्रवासवर्णनांतून डोकावू लागला, तर कधी तो " व्यक्तिचित्रा"तून साकारुं लागला, आठवणी, अनुभवांतून न्हावू डुंबू लागला हया सर्वांचे मूळ " मी "

लेखकाची आत्मनिष्ठा !

आत्माविष्कार !!!

हया आविष्काराच्या वेगवेगळया परी- निबंध -लघुनिबंध ललितनिबंध - आठवणी आणि अनुभवावर आधारित निबंध -प्रवासवर्णन आणि व्यक्तिचित्रे-आपण पाहिल्या त्यांचे स्वरुप समजावून घेतले आणि विशेष नोंदून ठेवले, आतां पहायचे -विकासांतील वळणे आणि वळणांचे शिल्पकार. !

## संदर्भटीपा


१. खांडेकर, वि. स.
प्रदक्षिणा ( मराठीतील निबंधवाड्.मय" हा लेख )
सातवी आ. पृ. २६९.

२. देऊळगांवकर, वि. पां.
देऊळगावकर, चंद्रकांत
मराठी निबंध -लघुनिबंध : स्वरूप व विवेचन
प. आ. पृ. २८.

३. वर्तक, चंद्रकांत
वाड्.मयाचे अध्यापन ( "ललितगद्य : अध्यापन दिशा" हा लेख )
प. आ. पृ. १६८

४. वर्तक, चंद्रकांत
तत्रैव
पृ. १६९

५. गाडगीळ, गंगाधर
पाण्यावरची अक्षरे
प. आ. पृ. ४ व ५

६. गाडगीळ, गंगाधर
तत्रैव
पृ. ५ व ६

७. आंबेकर, वि. बा.
तरंग आणि तुषार
प आ. पृ. ६२ व ६३

८. खांडेकर, वि. स.
पारिजात
प. आ. पृ. ८

९. काणेकर, अनंत
पांढरी शिडे ( प्रास्ताविक - वि. स. खांडेकर)
प. आ. पृ. २

१0. फडके, ना. सी.
मराठी लघुनिबंधाचा जनक कोण ?
प. आ. पृ. ८७

११. देऊळगांवकर, वि. पं.
देऊळगांवकर, चंद्रकांत
उनि
पृ. ९६

१२. फडके, ना. सी.
उनि
पृ. ६७ व ६८

१३. तत्रैव
पृ. ९७ व ९८

१४. पाटील, प्रसन्नकुमार
अक्षरगंध
प. आ. पृ. ७८ व ७९

१५. वर्तक, चंद्रकांत
उनि
पृ. १७३.

१६. यादव, आनंद
प्रदक्षिणा -खंड दुसरा ( स्वातंत्र्योत्तर काळांतील
ललित गद्य " हा लेख )
प. आ. पृ. २६९

१७. कोलारकर, रजनी
समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह
( समकालीन लघुनिबंध आणि नवलघुनिबंध" हा लेख )
प. आ. पृ. १९२.

१८. खोले, विलास
महाराष्ट्र साहित्य पत्रिका
दीपावली, १९८३, पृ. ५

१९. हातकणंगलेकर, म. द.
मराठी कथा : रूप आणि परिसर
प. आ. पृ. ११४

२०. वर्तक, चंद्रकांत
उनि
पृ. १७४

२१. घारे, दिपक
ललित
जुलै १९९१ पृ. ३१

२२. जहागिरदार, चंद्रशेखर
मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप
( ललित गद्य हा लेख )
प. आ. पृ. २०६

२३. जहागिरदार, चंद्रशेखर
तत्रैव
पृ. २१०.